Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,
*Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153*
**https://www.srjis.com/issues_data/231**
*Peer Reviewed & Refereed Journal, MAR-APRIL 2024, Vol- 12/82*
https://doi.org/10.5281/zenodo.11076966

# सर डॉ. मो. स. गोसावी एक आधुनिक शिक्षण महर्षि

श्रीम. परदेशी संगीता लक्ष्मणसिंह & डॉ. गायकवाड अतुल अरूण

गो.ए. सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर ,पीएच.डी. संशोधक

*sangeeta.pardeshi@rediffmail.com*

प्राचार्य, पीएच.डी. मार्गदर्शक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आर्वी ता.हवेली, जि. पुणे,

पिनकोड,*gaikwad.atul24@gmail com*

**Paper Received On:** 20 MAR 2024
**Peer Reviewed On:** 28APRIL 2024
**Published On:** 01 MAY 2024

***Abstract***

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक प्रगतीचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा दैदिप्यमान आहे. राजकारण विरहीत असणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. या संस्थेचा महावृक्ष त्यांच्या कार्याने बहरला आहे सारस्वतांचे सारस्वत व्हा हे नामाभिधान शिक्षण व अध्यात्मिक क्षेत्रात सार्थ करून दाखविले आहे. शिक्षण क्षेत्रातील एक तपस्वी ज्ञानसागर अशी अखंड जगतात त्यांची किर्ती तेजोमय आहे असे थोर गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा महासंचालक सर डॉ. मो. स. गोसावी आपल्याला सर्वपरिचीत आहेत. या राष्ट्राची सेवा करणारी पिढी घडविणे, शिक्षणातून शांततामय सुखी समाधानी समाज निर्माण करण्यावर त्यांनी कायम भर दिलेला दिसतो. सध्याचे शिक्षण समाजोपयोगी करण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. असे ते आपल्या प्राध्यापक वर्गाला कायम सांगतात. गोखले एज्युकेशन सोसायटीमध्ये प्रयोगशिलतापूर्वक शिक्षण या गोष्टीवर त्यांनी कायम भर दिलेला दिसतो. बी. वाय. के. महाविद्यालयाला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक वेगळे स्थान मिळवून दिले आहे. शांत, सयंमी, विचारप्रवण, कार्यकुशल, नेत्तृत्त्व गोखले एज्युकेशन सोसायटीला त्यांच्या रुपात लाभलेले दिसते.

**ठळक शब्द :** शिक्षण, क्षेत्र, योगदान, विचार आदी

**प्रास्ताविक :** वयाच्या २३ व्या वर्षी प्राचार्य होणं आणि त्यापुढे सलग ३७ वर्षे प्राचार्य राहिलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गोसावी सर मानवता धर्माचे उपासक आहेत.

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

जनकल्याण हा शिक्षणातून अंकुर पेरण्याचे काम त्यांनी केले. विद्यार्थ्याला देवाच्या रूपात पहावे ही विचारधारणा मानवता दृष्टी निर्माण करणारी आहे. गोखले एज्युकेशन सोसायटीने दुर्गम भागत शिक्षण संस्था सुरू करून शिक्षणापासून वचिंत घटकाला शिक्षण प्रवाहात आणण्याचे कार्य सातत्याने केले आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्याला आर्थिक दृष्ट्या परवडणारे शिक्षण देण्याची कल्पना सत्य रूपात राबविण्याचे काम सर गोसावी यांनी केलेले दिसते. प्रिं. टी. ए. कुलकर्णी यांनी ज्या विश्वासाने संस्थेची शैक्षणिक धुरा सोपविली त्याला सार्थ करून दाखविण्यात ते कधीच कमी पडले नाहीत. गोखले एज्युकेशन सोसायटीची पताका खांद्यावर घेऊन पुढे चालणारे कार्यकुशल मनुष्यबळ त्यांनी सक्षम केले. संस्थेसाठी सेवाभाव वृत्तीने राबणारा सक्षम सेवक वर्ग त्यांनी उभा केला.

गोखले एज्युकेशन सोसायटीला सर मो. स. गोसावी यांच्या प्रेरक विचाराचा मार्गदर्शक आधार कायमच आहे. लोक गुरुचरित्र वाचतात. पारायण करतात. गुरुचरित्रात २७ गुरूंचा उल्लेख करण्यात आला आहे. गुरु हे तत्त्व आहे. गुरु हे तत्त्व उत्तम शिष्य होऊन समजून घेतले पाहिजे. त्यासाठी सर डॉ. मो. स. गोसावी यांच्या सहवासात रमून गेले पाहिजे. त्यांच्यातील विचार प्राप्तीने जीवनात शीतलता अनुभवास येते. सर डॉ. मो. स. गोसावी ही एक शक्ती आहे जी ज्ञानाला धारण करण्यात सक्षम आहे व स्वत:च्या शक्तीने या ज्ञानाच्या तपाला शिष्याच्या स्तरावर आणू शकते. डॉ. मो. स. गोसावी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व सतत नावीन्यतेचा ध्यास वाढीस लागावा, शिक्षणातून संस्कृती, मनाची जडणघडण याचा ताळमेळ साधावा अशी भावना सातत्याने आपल्यामध्ये रूजवतात. गोखले एज्युकेशन सोसायटीची शैक्षणिक कामगिरी पाहिल्यावर भारत पुन्हा जगाचा गुरु बनेल. या आपल्या भावना खुद्द डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केल्या तेव्हा या पाठीमागे सर डॉ. मो. स. गोसावी यांचे योगदान फार मोठे आहे हे सहज लक्षात येते. गोखले एज्युकेशन सोसायटी ऐवढी बहुगुणी होऊ शकली ती सर मो. स. गोसावी यांच्या कार्यप्रवणतेमुळेच. गोखले एज्युकेशन सोसायटीमध्ये कोणतीही चांगली लोकपयोगी गोष्ट निर्माण करता येऊ शकते हा विश्वास त्यांनी कायम रूजवला आहे. विद्यार्थ्याला त्याच्या आवडीप्रमाणे शिक्षण घेण्याची मोकळीक सरांच्या कार्यामुळेच मिळताना दिसते. येणाऱ्या

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

काही वर्षात गोखले एज्युकेशन सोसायटी एका विद्यापीठाच्या रूपामध्ये बघायला मिळणार आहे. ग्रेट इंडिया हा संकल्प याच संस्थेचा आहे. एखादी संस्था कशी उभी करावी तिच्या प्रगतीच्या पायऱ्या कशा बांधाव्यात हे सरांच्या यशोगाथेतून सहज कळू शकेल.

सरांनी, शिक्षणासाठी जीवन वेचले, शिक्षणातून मानवी समाज घडवला, समाजातील व्यथा वेदना सोडवत मानव्य संस्कृती निर्माण केली. शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाचा विकास, ज्ञानात्मक कौशल्य वृत्ती निर्माण केली जावी यावर भाष्य करतात. त्यांनी काळाबरोबर सामाजिक अनुबंध साधत नवे शिक्षण संजीवक निर्माण केले. गोखले एज्युकेशन सोसायटीची शंभर वर्षातील ओळख राजकारण विरहीत, व्यक्ती विरहीत निर्माण केली. संस्थेच्या विविध विभागात नवनवीन विद्याशाखांची दर्जेदार व्यावसायिक, कालोचित नव्या अभ्यासक्रमाची महाविद्यालये स्थापन करून त्यांना स्थैर्य दिले. आपल्या द्रष्टेपणातून संस्थेसाठी आजीव सेवकांची मांदियाळी अविरत सुरू ठेवली. आपले वैयक्तिक व सामाजिक जीवन सुंदर करण्यासाठी आपल्या इंद्रियावर आजीवन विजय मिळवला. शुद्ध, पवित्र साधेपणा, भाव शुद्धी मनाची प्रसन्नता त्यांच्या ठायी सतत दिसत असते. त्यांचे संपूर्ण जीवन अभ्यासले तर आधि केले मग सांगितले असे आहे. जर सर विद्यापीठाचे कुलगुरू झाले असते तर भारतातील विद्यापीठांचे चित्र आजच्यापेक्षा निश्चितच उत्तुंग दिसले असते. त्यांची अध्यात्म पारायणाची साधना उत्तुंग आहे. पुण्यश्लोकी शिवपार्वती प्रतिष्ठानची स्थापना आध्यात्मिक उपक्रमासाठी केली. सर, आजही विद्यार्थी वृत्तीने विविधांगी वाचन करीत असतात. विषय कोणताही असला तरी त्यांच्या मार्गदर्शनात अचूकता बघायला मिळते. म्हणूनच सर एक चालते बोलते विद्यापीठ ठरले आहेत.

प्राचार्य डॉ. व्हि. एन. सूर्यवंशी सांगतात, साधारण 1985 ते 2000 च्या काळात विनाअनुदानीत महाविद्यालयाचे प्रमाण खूप कमी होते. अशा महाविद्यालयाला दरवर्षी सलग्नीकरणासाठी अर्ज करावा लागे व त्यासाठी एक समिती महाविद्यालयाच्या कामाकाजाची तपासणी करत असे त्यावेळी आमचे महाविद्यालय म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स आणि कंम्प्युटर सायन्सच महाविद्यालय होते त्याकाळी कॉम्प्युटर शिकवणारे पात्र शिक्षक अतिशय कमी प्रमाणात उपलब्ध असत. जाहिरात देवून सुध्दा असे शिक्षक मिळत नसत

त्यामुळे पुरेसा शिक्षकवर्ग नसायचा, त्याच प्रमाणे जे पात्र शिक्षक असत त्यांच्या सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करणे व्यवस्थापनाला शक्य होत नसे. तपासणी करणारे अधिकारी पूर्ण शिक्षक वर्ग, कॉम्प्युटर, शिक्षकेतर वर्ग सर्वांना नियमाप्रमाणे वेतन यावर जास्त भर देत. या तपासणी समितीने नकारात्मक अहवाल दिला तर महाविद्यालयावर परिणाम होईल म्हणून प्राचार्यांवर दबाव असे. जेव्हा जेव्हा अशी समिती महाविद्यालयाला भेट देत असे तेव्हा मला असा दबाव वाटत होता. त्यामुळे ज्या दिवशी ही समिती महाविद्यालयाला भेट देईल तो दिवस उगवूच नये असे वाटे त्या समितीच्या भेटीच्या स्वागतासाठी आम्ही आदरणीय सरांना बोलावत असू, सर असले म्हणजे आम्हाला खूप आधार वाटत असे. सरांना हे कळत असे. आम्ही सर्व तयारी करुन ठेवलेली असे प्रत्येक भेटीच्या वेळी सर येत असत आणि या समितीच्या सदस्या सोबत सर्व चर्चा आणि संवाद करीत असत. त्यामुळे मला काहीच दडपण राहत नसे. समिती महाविद्यालयातून परत गेल्यानंतर सर परत जात असत. सर आले नाहीत असं एकदाही घडलं नाही. त्यामुळे सर प्रत्येक महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांच्या पाठीमागे खंबीर पणे उभे राहत असत.[१]

सरांचं व्यक्तिमत्व म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. एच.पी.टी. महाविद्यालयात असतांना आम्हाला विद्यार्थीनींच्या वसतिगृहासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 1 कोटी रुपयाचे अनुदान मिळाले होते. या अनुदानामधून आणि गोखले एज्युकेशन सोसायटीने त्यामध्ये तेवढाच निधी घालून अत्यंत उत्तम वसतिगृह निर्माण केले. हे वसतिगृह खरंच बांधल आहे किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी युजीसी ची एक समिती त्यासाठी भेट देणार हाती. होस्टेल पूर्ण झाले होते आणि शेवटची रंगरंगोटी सुरु होती. एक आठवडा आधी आम्हाला सूचना मिळाली होती त्या प्रमाणे सरांना आम्ही विनंती केली की या समितीच्या भेटीच्या वेळी समितीच्या स्वागतासाठी त्यांनी यावे. सरांनी लगेच होकार दिला आणि काय तयारी झाली आहे हे पाहण्यासाठी दोन दिवस अगोदर एक सभा घेतली. सभेत फक्त आम्ही तिघेजण होते सर ...पी.एम. देशपांडे सर आणि मी सरांनी यु. जी. सी. च्या सर्व पत्रावर नजर टाकली त्यांच्या काही अटी आहेत का ते तपासले आणि सरांच्या लगेच लक्षात आले की स्वयंपाक घर आहे परंतू विद्यार्थीनी साठी डायनिंग हॉल

केलेला आहे तो यु.जी.सी. च्या अटी पूर्ण करणारा नाही. आहे त्या प्रमाणे जर समिती समारे गेले तर समिती अपूर्ण म्हणून अहवालात कळवू शकेल. सर्वांना तेव्हाच सूचना केली आणि दोन दिवसात आम्ही यु.जी.सी. च्या अटीप्रमाणे डायनिंग हॉल आणि किचन पूर्ण केले. समितीने भेट दिली आणि आमचे होस्टेल बांधून पूर्ण झाले आहे असा अहवाल ही दिला.[२]

एकदा एक समिती एका दाखल्यावर मी सही का करू अस विचारले सर लगेच म्हणाले प्राचार्यानी सही केली आहे. तुम्ही सही करायला काहीच हरकत नाही आणि त्या सदस्यांनी लगेच सही केली. कधी असे प्रसंग निर्माण झाले तर त्यावर सर लगेच उपाय सुचवत असत त्यामुळे प्रश्न सहज सुटत असे. या काळात संगणक शास्त्राचे अध्यापानासाठी पात्र शिक्षक मिळत नसत कारण एक तर पात्रता धारक कमी असत आणि जे पात्रता धारक आहेत त्यांना संगणक क्षेत्रात खूप मोठया प्रमाणामध्ये मागणी होती. त्यामुळे शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रात खूप मोठया प्रमाणामध्ये मागणी होती. त्यामुळे शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना संगणकाच सखोल अध्यापन करणारे तज्ञ शिक्षक मिळत नसत. परंतु सरांच्या एच.ए.एल. फॅक्टरी मधील व्यवस्थापनासोबत असलेल्या अतिशय उत्तम संबंधामुळे एच.ए.एल. कारखान्यातील संगणक विभागातील जे तज्ञ आहेत ते एच.ए.एल. कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयात शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी येत असत. औद्योगिक संस्थेशी अशा प्रकारचा अनुबंध त्याकाळी सरांच्या प्रभावशाली नेतृत्वामुळे शक्य झाला.

सरांनी संस्थेच्या विस्तारासाठी देणगीदार उद्योगपती उद्योजकांचा अनुबंध कायम जपला आहे. शिक्षक आजीवन विद्यार्थी व चिकित्सक विचारवंत असावा, त्यांने बदलाचे नेतृत्त्व करावे हा सरांचा विचार संस्थेच्या स्टाफ ट्रेनिंग ॲकॅडमीच्या यशस्वी अंमलबजावणीतून साकार झालेला दिसतो. सरांनी, प्रिं. टी. ए. कुलकर्णी यांचे स्वप्न प्रत्यक्ष साकार करून दाखविले आहे. सरांचे इतके ओजस्वी आयुष्य व तैलबुद्धिमत्ता सर्व क्षेत्रातील जनांना सदैव मार्गदर्शक आहे. दुसऱ्यास आनंदी करावे । तेणे आपण आनंदी व्हावे । हा जीवनमंत्र जपणाऱ्या थोर सरस्वती पुत्राला परमेश्वर चिंरजीव ठेवो, हीच प्रार्थना !!

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

## संदर्भसूची :

. संपादक, के. एम. लोखंडे, उन्मेष वार्षिक , गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, पृ. २५

. तत्रैव, पृ. २९

**Cite Your Article as:**

*Pardeshi Sangeeta Lakshmansingh & Dr. Gaikwad Atul Arun. (2024). SIR DR. MO.S.GOSAVI EK ADHUNIK SHIKSHAN MAHARSHI. In Scholarly Research Journal for Interdisciplinary studies (Vol. 12, Number 82, pp. 72–77). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.11076966*

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*